**भाषा संचालनालयातील अस्थायी पदांना दि.१.१०.२०१७ ते दि.३१.१२.२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

मराठी भाषा विभाग

शासन निर्णय क्रमांकः अस्थाप-२०१७/प्र.क्र.१११/आस्था-२,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

तारीख: २५ ऑक्टोबर, २०१७.

वाचा-

१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-१००३/६५१/प्र.क्र.४८/२००३/२०ब, दि. १३.०१.२००४.

२) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/विसु-१, दिनांक ११.०२.२०१६

३) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/विसु-१, दिनांक २१.०९.२०१६.

४) मराठी भाषा विभाग,शासन निर्णय क्र.अस्थाप-२०१७/प्र.क्र.३३/आस्था-२ दि.२८.०२.२०१७.

५) भाषा संचालक,भाषा संचालनालय,मुंबई यांचे पत्र क्र.पदनि २०१६/२०६६/ /चौदा दि.१२.१०.२०१७ चे पत्र.

६) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक पदनि २०१६/प्र.क्र.८/आ.पु.क., दिनांक ०३.१०.२०१७ व शुध्दीपत्रक दि.१७.१०.२०१७.

**शासन निर्णय**

मराठी भाषा विभागाच्या अधिनस्त भाषा संचालनालय, मुंबई (मुख्यालय) व भाषा संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या नवी मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद या चार विभागीय कार्यालयातील एकूण १५ अस्थायी पदांना संदर्भाधिन क्र.४ येथील शासन निर्णयान्वये दिनांक १ मार्च, २०१७ ते दि.३० सप्टेंबर,२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

२. आता संदर्भाधीन क्र.६ येथील शासन निर्णयानुसार, खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे भाषा संचालनालय, मुंबई (मुख्यालय) व त्यांच्या अधिनस्त असलेल्या नवी मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद विभागीय कार्यालयातील एकूण १५ अस्थायी पदांच्या आवश्यकतेबाबतचा संदर्भ क्र.५ येथील प्रस्ताव विचारात घेता सदर १५ पदे पुढे चालू ठेवण्यास विहित अटींच्या अधीन राहून दि. **१.१०.२०१७ ते दि.३१.१२.२०१७** पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

| अ.क्र | कार्यालयाचे नाव | पदनाम | अस्थायी पदसंख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|
| | भाषा संचालनालय, मुंबई (मुख्यालय) | अनुवादक (मराठी) | ६ | ९३००-३४८००<br>ग्रेड वेतन रु.४२०० |
| | | लघु-टंकलेखक (मराठी) | १ | ५२००- २०२००<br>ग्रेड वेतन रु.२४०० |
| | **एकूण** | | **७** | |
| २. | भाषा संचालनालय विभागीय कार्यालये | | | |
| | १) नवी मुंबई | विभागीय सहायक भाषा संचालक (अनुवाद व शब्दावली) | १ | ९३००-३४८००<br>ग्रेड वेतन रु.४४०० |
| | | लिपिक-टंकलेखक | १ | ५२००- २०२००<br>ग्रेड वेतन रु.१९०० |
| | | चपराशी | १ | ४४४०-७४४०<br>ग्रेड वेतन रु.१३०० |
| | २) पुणे | अनुवादक (मराठी) | १ | ९३००-३४८००<br>ग्रेड वेतन रु.४२०० |
| | ३) नागपूर | वरिष्ठ लिपिक | १ | ५२००- २०२००<br>ग्रेड वेतन रु.२४०० |
| | | लिपिक-टंकलेखक | १ | ५२००- २०२००<br>ग्रेड वेतन रु.१९०० |
| | ४) औरंगाबाद | अधीक्षक | १ | ९३००-३४८००<br>ग्रेड वेतन रु.४३०० |
| | | अनुवादक (मराठी) | १ | ९३००-३४८००<br>ग्रेड वेतन रु.४२०० |
| | **एकूण** | | **८** | |
| | **एकूण अस्थायी पदे (१+२)** | | **१५** | |

३. उपरोक्त बाबींवर होणारा खर्च "मागणी क्रमांक झेडएफ-०१,२०५२, सेक्रेटरिएट- सर्वसाधारण सेवा, ०९०, सेक्रेटरिएट (००) (०२) भाषा संचालक ०१ वेतन (दत्तमत्त) (२०५२५०६३)" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०१७-२०१८ या वित्तीय वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

प्रस्तुत शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक : पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.०३.१०.२०१७ व शासन शुध्दीपत्रक दि.१७.१०.२०१७ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक **२०१७१०२६१२२६११२०३३** असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने**,**

Nanda Maruti Raut

Digitally signed by Nanda Maruti Raut
Date: 2017.10.26 15:29:05 +05'30'

**(नंदा मा.राऊत)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०००५१.
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता /(लेखा व परिक्षा), महाराष्ट्र-१,मुंबई / महाराष्ट्र-२, नागपूर.
३) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
४) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
५) उप कोषागार अधिकारी, कोकण भवन, नवी मुंबई.
६) कोषागार अधिकारी, ठाणे, पुणे, नागपूर, औरंगाबाद.
७) भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय, नवी मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद.(भाषा संचालनालयामार्फत)
८) वित्त विभाग (व्यय-४) व वित्तीय सुधारणा-१, मंत्रालय, मुंबई.
९) मराठी भाषा विभागाची सर्व कार्यासने.
१०) निवडनस्ती.